# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजित ५ व्या सभेचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची ५ वी सभा शुक्रवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली '**वनभवन**' रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समितीचे सदस्यांची व निमंत्रित अधिकाऱ्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी पाचव्या सभेच्या सुरूवातीस मा.अध्यक्ष व इतर उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व विषयसूचीनुसार सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

**विषय क्र.१:- दिनांक २८/०७/२०१७ रोजी टकले सभागृह, वनभवन, नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक २८/०७/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्रमांकःव्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१०/२४८/२०१६-१७ दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यात आलेला असुन सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्यांकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणा करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. करिता सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात यावे, अशी सदस्य-सचिव यांनी कार्यकारी मंडळास विनंती केली व त्यानुसार कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

**विषय क्र.२:- "निसर्गानुभव" योजनेबाबत अहवालाचे सादरीकरण व पुढील वर्षाचे नियोजन.**

सदस्य-सचिव तथा व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं यांनी सादरीकरणादरम्यान स्पष्ट केले की, मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे मान्यतेने व मार्गदर्शनानुसार नागपूर वन विभागात **"निसर्गानुभव"** कार्यक्रमांतर्गत एक दिवसीय पर्यावरण शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. वनपरिक्षेत्र स्तरावर ५ शाळेच्या एकूण २०० विद्यार्थ्यांना संसाधनांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक शाळेकरिता एक इको-कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत. नागपूर जिल्ह्यातील एकूण ४५ जिल्हा परिषद शाळा व आदिवासी शाळांच्या

एकूण २,२०० विद्यार्थ्यांना व ५५ शिक्षकांना दिनांक ४ ते १० डिसेंबर, २०१७ दरम्यान, पर्यावरण संरक्षणाच्या उद्देशांची माहिती व अनुभवाचे माध्यमाने पारिस्थितीकीय तंत्राचे घटकांची व्याख्या, पर्यावरण संरक्षण, जैव विविधता, पक्षी दर्शन, वन औषधी आणि वन व्यवस्थापनाची सामान्य माहिती व अनुभव प्रदान करण्यात आले. हा कार्यक्रम राबविण्याकरिता अशासकीय संस्थांची मदत घेण्यात आली असुन हा कार्यक्रम उत्तम प्रकारे यशस्वी झाला असुन त्यास फार प्रचार व प्रसिद्धी मिळाली आहे. चालू वित्तीय वर्षात ही योजना चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात सुद्धा राबविण्यात येत आहे.

भविष्यातील पिढी पर्यावरणाप्रती जागरूक व्हावी व त्यांना निसर्ग व पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन योग्यरित्या व्हावे याकरिता हा कार्यक्रम पुढील आर्थिक वर्षात कॅम्पा निधीतून १५ जिल्ह्यांमध्ये राबविण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता प्रतिजिल्हा २,००० विद्यार्थी हे लक्ष्य निर्धारित करून साधारणपणे ३०,००० विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सामावुन घेण्याचे प्रस्तावित आहे. हा कार्यक्रम राबविण्याकरिता प्रति विद्यार्थी रू.६००/- याप्रमाणे रू.१.८० कोटी खर्च अपेक्षित आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली**.

**विषय क्र.३:- "निसर्गभ्रमण" योजनेबाबत शासनास पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देणे**.

सदस्य-सचिव तथा व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं यांनी याबाबतचे सादरीकरण केले. त्यांनी स्पष्ट केले की, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे व शासनाने याबाबत विचारणा केलेल्या मुद्यांवर खुलासाही पाठविण्यात आला आहे. यात निसर्ग पर्यटनाशी संबंधित अशासकीय संस्था किंवा व्यक्ति यांची नोंदणी पर्यटन मंडळामध्ये करून त्यांचे सहाय्याने निसर्ग पर्यटनाचे कामाला वाढविण्याचे प्रस्तवित आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली**.

**विषय क्र.४:- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचा सर्वसाधारण व आकस्मिक निधी स्थापित करण्याबाबत**.

सदस्य-सचिव तथा व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं यांनी विषयांकित प्रकरणी सादरीकरण केले व त्यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधीमध्ये नियम क्रमांक २० "निसर्ग पर्यटन विकास मंडळ निधी" अंतर्गत बाब क्रमांक १ ते ४ अन्वये निधी स्त्रोत

नमुद केले आहेत. त्याअंतर्गत राज्य पर्यटन योजनेतून होणाऱ्या कामात बचत, विविध निसर्ग पर्यटन स्थळांच्या गेट-मनीपासून प्राप्त महसूलाच्या १०% गेट-मनी महसूल महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे सर्वसाधारण निधी म्हणून समाविष्ट करण्यात यावा, तसेच निसर्ग पर्यटन शिर्षांतर्गत (A-०९६) अन्वये प्राप्त अनुदान, केंद्र / राज्य शासन यांचे उपक्रम व स्थानिक संस्था यांचेकडुन प्राप्त अनुदान व कर्जे, याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

चर्चेदरम्यान मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांनी सूचित केले की, **१० टक्के गेटमनीबाबत प्रस्ताव व्याघ्र प्रकल्पांकरिता Tiger Foundation च्या सभेमध्ये पास करून घ्यावा**.

**सूचनांची नोंद घेऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली**.

**विषय क्र.५:- इंडियन इन्स्टिटयुट ऑफ फॉरेस्ट मॅनेजमेंट (IIFM) च्या ७ पदवीधरांना कंत्राटी पद्धतीवर मंडळामध्ये क्षेत्रिय कार्यासाठी ठेवण्याबाबत**.

सदस्य-सचिव यांनी विषयाचे सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मध्य प्रदेशामध्ये IIFM या संस्थेचे पदवीधर, साहसी क्रिडा प्रकारातील तज्ञ व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ यांना मध्य प्रदेश निसर्ग पर्यटन मंडळाने क्षेत्रिय कामांकरिता कंत्राटी पद्धतीवर अनुबंधित केले असुन अशा तज्ञांना क्षेत्रिय मुख्य वनसंरक्षक यांचे अधिनस्त पदस्थापना देण्यात आली आहे. अशा प्रकारची कार्यवाही महाराष्ट्र राज्यात सुद्धा नियोजित करण्यात येत असुन या कार्यवाहीतुन पर्यटन विकासाचे प्रकल्प तयार करण्यास मदत होईल. ह्यासाठी एकूण ७ (२ मंडळ व पांच क्षेत्रिय स्तरावर) पदविधरांना कंत्राटी पद्धतीवर ठेवण्याकरिता प्रस्ताव लवकरात लवकर शासनास सादर करण्याचे प्रायोजित आहे.

चर्चेदरम्यान मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांनी सूचित केले की, निसर्ग पर्यटन क्षेत्रामध्ये निपुण असे सेवानिवृत्त अधिकारी यांची सुद्धा मंडळामध्ये कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्यात यावी. तसेच तांत्रिक दृष्टीने आपल्याकडील ICT च्या टिममधील कुणाला स्वतत्रपणे घेता येण्यासारखे आहे की काय, त्याबाबत पडताळणी करावी.

**मा. अध्यक्षांचे सूचनेची नोंद घेवुन सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली**.

**विषय क्र.६:- कॉफी टेबल बुक छपाई करणेबाबत.**

सदस्य-सचिव यांनी विषयाचे सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, विदर्भातील निसर्ग पर्यटन स्थळांचे कॉफी टेबल बुक तयार करण्यात आले असून त्याचे विमोचन मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील कॉफी टेबल बुकचे (भाग-१ व २) प्रारूप तयार करण्यात आले असून या पुस्तिकेचे डिझाईन व प्रिंटींग करून पुरवठा करण्याबाबत M/s Pugmark Art Gallery, Kolhapur यांना Top Eco-tourism Destinations of Western Ghats (Nashik, Mumbai) तसेच Asmita Kulkarni, Kolhapur (Raigad, Satara, Kolhapur, Singhudurga, Pune) यांना या पुस्तिकेचे डिझाईन व प्रिंटींग करून पुरवठा करण्याबाबत कळविलेले आहे.

**सदस्यांनी या पुस्तिकांचे मार्केटींगबाबतही प्रयत्न करण्यात यावेत, अशी सूचना केली.**

**सदस्यांनी दिलेल्या सूचनेची नोंद घेवुन सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.७:- वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या लेखा परिक्षण अहवाल.**

सदस्य-सचिव यांनी सादरीकरणाद्वारे समितीला अवगत केले की, मंडळाच्या लेख्यांचे वित्तीय वर्ष २०१६-१७ चे लेखा परिक्षण श्री अग्रवाल व श्री गुप्ता, सनदी लेखापाल (Chartered Accountant) (CAG मान्यताप्राप्त), पंचशिल सिनेमा बिल्डींग, सिताबर्डी, नागपूर यांचेकडुन करण्यात आले आहे. ह्या कार्यवाहीस कार्यकारी समितीची मान्यता हवी आहे.

**चर्चेअंती प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.८:- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांना व्याघ्र फाऊंडेशन व एल.ए.सी. मध्ये सदस्य म्हणून घेण्याबाबत.**

सदस्य-सचिव यांनी विषद केले की, व्याघ्र फाऊंडेशन व स्थानिक सल्लगार समितीचे काम प्रामुख्याने व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटनाचे कामाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे व देखरेख ठेवणे, हे आहे. व्याघ्र फाऊंडेशनच्या नियामक मंडळात व स्थानिक सल्लागार समितीच्या सभांमध्ये निसर्ग पर्यटनाबाबत महत्वाचे निर्णय घेण्यात येत असतात. तसेच राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने वन्यजीव अधिनियम १९७२ चे कलम ३८- O(१) अंतर्गत अधिसूचीत केलेले (Normative standards for tourism activities and tiger project guidelines २०१२ मधील कलम क्र.२.१८ (M) मध्ये पर्यटनाशी संबंधित प्रतिनिधींची नेमणूक करण्याबाबत प्रावधान आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांना व्याघ्र फाऊंडेशनच्या नियामक मंडळात तसेच स्थानिक सल्लागार समितीमध्ये सदस्य म्हणून घेतल्यास धोरणात्मक निर्णयात मंडळाचे मत व्यक्त होऊन निसर्ग पर्यटनाचे कामास चालना मिळेल. तसेच व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटनाबाबत ठोस निर्णय घेण्यास मदत होऊन महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ व व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांना निसर्ग पर्यटन कामाबाबत समन्वय साधता येईल.

**सादरीकरण व चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र.९:- कार्यआयोजनामध्ये निसर्ग पर्यटनाचे प्रकरण समाविष्ठ करण्याबाबत.**

सदस्य-सचिव यांनी सादरीकरणाद्वारे विषद केले की, कार्यआयोजना संहिता २०१४ चे बाब क्र.८.६, पान क्र.३६ वर निसर्ग पर्यटन स्थळांची ओळख करून त्यांची पद्धतशीर यादी तयार करण्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे. तसेच कार्यआयोजना संहिता २०१४ बाब क्र.viii, पान क्र.४३ वर निसर्ग पर्यटनाचा वनावर होणारा परिणाम, सहभागी वनव्यवस्थापन क्षेत्रात घेण्यात येणारे निसर्ग पर्यटन व त्याचे प्रकार इत्यादीबाबत माहिती देणे अपेक्षित आहे. त्यात खालीलप्रमाणे मुद्दे समाविष्ट करण्यात यावे असे मत आहे.

**मुद्दा क्र. १ : निसर्ग पर्यटन स्थळांचा प्रकार व त्याचे वर्गिकरण** – निसर्ग पर्यटन स्थळांचे संवर्धन, राखिव, धार्मिक, पुरातत्व, साहसी क्रिडा, जलक्रिडा, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प असे वर्गिकरण करण्यांत यावे, तसेच प्रत्येक निसर्ग पर्यटन स्थळात विकसित करावयाच्या सोयी उदा. वनभ्रमण, निसर्ग शिक्षण व दर्शन, सायकलिंग, गिर्यारोहण, जंगल सफारी, याबाबत माहिती देण्यात यावी.

**मुद्दा क्र. २ : पायाभूत सुविधांचा विकास** – निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरिता ज्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे त्यांची यादी व त्यासाठी येणारा खर्च, निसर्ग पर्यटन स्थळांची प्रसिद्धी व प्रसार करण्याकरिता उपाययोजना करण्यात यावी.

**मुद्दा क्र. ३ : मानव संसाधन विकास** – निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरिता व परिरक्षणाकरिता आवश्यक मनुष्यबळाबाबत व वार्षिक खर्चाबाबत माहिती देण्यात यावी.

या संदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र.१०:- संरक्षित क्षेत्राबाहेर मनोरंजन व वन्यप्राणी अनुभव नियमांबाबत.**

सदस्य-सचिव यांनी विषयाचे अनुषंगाने सादरीकरण करून स्पष्ट केले की, भारतीय वन अधिनियम १९२७ (१९२७ चा १६) मधील कलम २६ च्या तरतूदीन्वये पोट-कलम (२-अ) व ७६ (ड) च्या तरतूदीन्वये राज्य शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारान्वये वनक्षेत्रामध्ये मनोरंजन व वन्यप्राणी अनुभवाकरिता (संरक्षित क्षेत्राशिवाय) नियम तयार करून शासनाची मंजुरी मिळण्याकरिता पाठविण्यात आलेले आहे. ह्या कार्यवाहीस कार्यकारी समितीची मान्यता हवी असल्याने सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र.११:- गाईड युनिफॉर्म व संकेत फलक (uniform signages) पॅटर्नबाबत.**

सदस्य-सचिव यांनी सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, निसर्ग पर्यटनाच्या सर्व स्थळांमधील गाईड्स व नॅच्युरालिस्ट्स यांचे युनिफॉर्म एकसारखे असण्याबाबतचे प्रस्ताव क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडुन मागविण्यात आले असुन त्यांचेकडुन प्रस्ताव प्राप्त होताच युनिफॉर्मचे डिझाईनला अंतिम स्वरूप देण्याची तजविज ठेवली आहे.

तसेच पुढे स्पष्ट केले की, संकेत फलकाचे (uniform signages) पॅटर्न CEE Ahmedabad या संस्थेकडुन तयार करून घेण्यात आले व ते सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्याबाबत त्यांच्या काही सूचना/अभिप्राय असल्यास त्या या कार्यालयास पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्या प्राप्त होताच संकेत फलकाचे अंतिमिकरण करण्याची तजविज ठेवली आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती उक्त दोन्ही बाबीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.**

**विषय क्र.१२:- प्रसिद्धी / प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रगति अहवालाची सद्यःस्थिती.**

दिनांक २८ जूलै, २०१७ रोजी झालेल्या सभेच्या अनुषंगाने निसर्ग पर्यटन स्थळांची मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी करण्याकरिता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सन २०१७-१८ करिता रू.२६५.०० लक्षची मागणी करण्यात आली आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता वार्षिक कॅलेंडर तयार करण्यात आले असून गाईड, नॅचरालिस्ट इत्यादीसाठींचे प्रशिक्षण हाती घेण्यात येत आहे. चालु महिन्यात गाईड प्रशिक्षण STR व माळी प्रशिक्षण मुख्य वन संरक्षक, गडचिरोली यांच्यामार्फत घेण्यात येत आहे.

**सादरीकरण व चर्चेअंती विषयांकित प्रगतिची नोंद घेवुन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.**

## विषय क्र.१३:- नवीन निसर्ग पर्यटन स्थळांचे प्रकल्प आराखड्यांना मान्यता देणेबाबत.

विषयांकित प्रकरणी प्रकल्प आराखडानिहाय सादरीकरण व झालेली चर्चा आणि समितीद्वारा देण्यात आलेले निर्णय याचा तपशिल पुढील प्रमाणे.

### अ.प्र.मु.व.सं. (वन्यजीव) पूर्व,

**१३.०१ नवेगांव – नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, गोंदिया, निसर्ग पर्यटन आराखडा.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १३.०१ | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण **श्री. अमलेन्द्र पाठक, उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया** यांनी केले.<br>वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, गोंदिया यांचेद्वारा **राज्य स्तरिय निसर्ग पर्यटन योजना** (२४०६-२२९५) **अंतर्गत सन २०१७-१८ ते २०२१-२२ पर्यंत पांच वर्षाचा एकूण रूपये १६४९.०० लक्ष रक्कमेचा आराखडा सादर केला आहे**.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट करण्यात आले की, राज्यस्तरिय निसर्ग पर्यटन योजना अंतर्गत सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंतच्या ५ वर्षाच्या कालावधीकरिता पर्यटन आराखडा तयार करण्यात आलेला होता. सदरच्या आराखड्यात निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने फक्त पर्यटन रस्त्यांची दुरूस्ती, नवीन रपटे बांधणे, रपट्यांची दुरूस्ती पर्यटकांसाठी तंबु निवास व्यवस्था व प्रवेशद्वारावर पर्यटन सुविधा उपलब्ध करून देणे या कामांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे पर्यटनासाठी अतिआवश्यक असलेल्या कामांचा समावेश चालु बाब/नवीन बाब प्रस्तावात करता येऊ शकत नव्हता. जर त्यांचे कार्यालयाकडून प्रस्तावात अतिआवश्यक कामांचा समावेश केला तर ती कामे सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंतच्या मंजुर आराखड्यात अंतर्भुत नसल्यामुळे ती कामे नामंजुर करण्यात येत होती.<br>त्यामुळे नवेगांव नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्राकरिता राज्यस्तरिय निसर्ग पर्यटन योजनाकरिता सन २०१७-१८ ते | सदर प्रकल्पाचे सादरीकरण व चर्चेदरम्यान समितीद्वारा पुढील प्रमाणे सूचना दिल्या.<br>१. DPR करिता कंसल्टंट नेमण्यात यावा.<br>२. रस्त्यांची दुरूस्ती व रस्ते तयार करण्याकरिता इतर स्त्रोतातून निधी उपलब्ध करण्यात यावा.<br>३. समस्त व्याघ्र राखिव क्षेत्राचा एकच DPR न बनवता निसर्ग पर्यटन स्थळांच्या मार्गदर्शक तत्वानुसार समस्त बाबी लक्षात घेवुन वेगवेगळया ठिकाणी पर्यटन स्थळांची निवड |

| | | |
|---|---|---|
| | २०२१-२२ पर्यंतच्या ५ वर्षाच्या कालावधीकरिता **नव्याने निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्यात आला असुन** सदर पर्यटन आराखड्यामध्ये प्रामुख्याने पर्यटन रस्त्यांची दुरूस्ती, नवीन रपटे तयार करणे, रपट्यांची दुरूस्ती, अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचा दर्जा न बदलविता विशेष दुरूस्ती करणे, अस्तित्वात असलेल्या विंधन विहीरींवर वन्यप्राण्यांना मुबलक पाणी उपलब्धतेकरिता सोलर सबमर्शिबल पंप बसविणे, EDC मार्फत तंबु निवास व्यवस्था व इतर पर्यटन सुविधा पुरविणे, पर्यटक प्रवेशद्वाराजवळ सुविधा करणे, नागझिरा चौकशी कक्षाची दुरूस्ती, जिप्सी व इतर पर्यटक वाहनांची पार्किंग व्यवस्था तसेच इको-गाईड व जिप्सी चालकांकरिता बसण्याची व्यवस्था करणे, निसर्ग पर्यटन प्रचार व प्रसिद्धी (माहिती पुस्तिका, घडी पत्रके, प्रसिद्धी फलक, भिंत रंगविणे, सूचनाफलक, माहितीदर्शक फलक, आकाशवाणी/ दुरदर्शन/ माहितीपट तसेच इतर मार्गाने प्रसिद्धी इत्यादी), EDC गावांमध्ये होम-स्टे सुविधा सुरू करण्याकरिता आर्थिक सहाय्य करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.<br>संरक्षित क्षेत्रामध्ये १. नागझिरा अभयारण्य, २. नवीन नागझिरा अभयारण्य ३. नवेगांव राष्ट्रीय उद्यान ४.नवेगांव अभयारण्य व ५.कोका अभयारण्य, यांचा समावेश आहे. अधिसूचनेनुसार नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र ६५६.३६ चौ.कि.मी. असुन अबाध्य व्याघ्र क्षेत्र (CTH) ६५३.६७ चौ.कि.मी. आहे. तसेच अधिसूचित बफर क्षेत्र १२४१.२७ चौ.कि.मी. आहे व व्याघ्र प्रकल्प एकूण कोअर व बफर क्षेत्र १८९४.९४ चौ.कि.मी. आहे.<br>सन २०१२-१३ ते २०१६-१७ मध्ये विविध योजनेअंतर्गत वर्षवार निसर्ग पर्यटन विकास कामाकरिता एकूण रू.८७४.६४ लक्ष अनुदान प्राप्त झाले असुन हे अनुदान खर्च झालेले आहे.<br>निसर्ग पर्यटन योजना अंतर्गत घ्यावयाच्या कामाबाबत 5 वर्षाचे नियोजन पुढील प्रमाणे:-<br>पर्यटन रस्ते सुस्थितीत ठेवणे / आवश्यक ठिकाणी NBWL चे परवानगीने नवीन रपटे बनविणे / अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचा दर्जा न बदलविता विशेष दुरूस्ती करणे (Medium & High risk zone roads) / रपट्यांची दुरूस्ती / अस्तित्वात असलेल्या विंधन विहीरींवर वन्यप्राण्यांना मुबलक पाणी उपलब्धतेकरिता सोलर | करून प्रत्येक स्थळासाठी वेगवेगळे DPR तयार करण्यात यावे. प्रत्येक स्थळी पर्यटकांसाठी सोईसुविधा उपलब्ध करण्याची तरतूद करून पूर्ण असा एक complete पॅकेज असावा. तसेच त्यान्वये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल व त्यांचे राहणीमान उंचावेल याचीही काळजी घेण्यात यावी.<br>४. नागपूर ठिकाणापासून पर्यटकांना पर्यटन स्थळी येणे सोयीचे व्हावे म्हणून सर्कीट टुरिझ्मची पडताळणी करावी जेणेकरून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना पर्यटन स्थळी पोहोचणे सोईचे होईल.<br>५. वन्यजीव, वनविकास महामंडळ व निसर्ग पर्यटन यांचे संगनमताने (co-ordination) |

| | | |
|---|---|---|
| | सबमर्शिबल पंप बसविणे / पर्यटनाकरिता ग्राम परिस्थितीकीय विकास समितीमार्फत तंबु निवास व्यवस्था व इतर पर्यटन सुविधा पुरविणे / पर्यटक प्रवेशद्वाराजवळ सुविधा उपलब्ध करून देणे (कमान, बुकींग ऑफीस, प्रतिक्षालय, टॉयलेट, बाथरूम व सोव्हीनियर शॉपचे बांधकाम, विंधन विहीर तसेच RO व फिल्टर, इत्यादी ) / निसर्ग निर्वाचन केंद्राचे बांधकाम करणे / निसर्ग निर्वाचन केंद्राकरिता साहित्य खरेदी, त्याची स्थापना व सुधारणा करणे / नागझिरा येथील चौकशी कक्षाची दुरूस्ती / जिप्सी व इतर पर्यटक वाहनांची पार्किंग व्यवस्था तसेच इको-गाईड व जिप्सी चालकांकरिता बसण्याची व्यवस्था / निसर्ग पर्यटन प्रचार व प्रसिद्धी (माहिती पुस्तिका, घडी पत्रके, प्रसिद्धी फलक, भिंत रंगविणे, सूचनाफलक, माहितीदर्शक फलक, आकाशवाणी/ दुरदर्शन/माहितीपट तसेच इतर मार्गाने प्रसिद्धी इत्यादी) / ग्राम परिस्थितीकीय विकास समितीमार्फत गावांमध्ये होम-स्टे सुरू करण्याकरिता आर्थिक सहाय्य करणे. | सर्कीट टुरिझ्म प्लान करता येवु शकेल.<br>६. होमस्टे विकसित करण्यासाठी लाभार्थ्यांची निवड करून शामाप्रसाद मुखर्जी योजना व व्याघ्र फाऊंडेशनच्या निधीतून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे.<br>वरिल अटी व सूचनांच्या अधिन राहुन **प्रकल्प आराखडा सुधारित करण्याचे अटीवर प्रकल्प आराखडा मंजूर करण्यात आला.** |

## १३.०२ चिखलदरा निसर्ग पर्यटन विकास योजना – पूर्व मेळघाट वनविभाग, चिखलदरा.

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१३.०२** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण **श्रीमती पियुषा प्रमाद जगताप, उपवनसंरक्षक, पूर्व मेळघाट** यांनी केले.<br>सादरीकणाद्वारे स्पष्ट केले की, निसर्ग पर्यटन विकास राज्य स्तरिय योजनेअंतर्गत (२४०६-२२९५) खालील निसर्ग पर्यटन स्थळांचा समावेश आहे. | सदर प्रकल्पाचे सादरीकरण व चर्चेदरम्यान समितीद्वारा पुढील प्रमाणे सूचना दिल्या.<br>१. प्रस्तावित सहाही स्थळांचा वेगवगळा स्वतंत्र असा प्रकल्प आराखडा निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासासाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करण्यात यावा. असे एकूण ६ प्रकल्प स्थळांचे ६ आराखडे होतील. प्रत्येक स्थळी पर्यटकांसाठी सोईसुविधा उपलब्ध करण्याची तरतूद करून पूर्ण असा एक complete पॅकेज असावा. तसेच त्यान्वये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल व |

| **चिखदलरामधील पर्यटन स्थळ** | **अपेक्षित खर्च रू. लक्ष** |
|---|---|
| १. आमझरी निसर्ग पर्यटन संकुल – (नैसर्गिक स्थळ) | २१.०० |

| | |
|---|---|
| २. चिखलदरा शासकीय वन उद्यान | २०.०० |
| ३. चिखलदरा कॅक्टस गार्डन | १८.०० |
| ४. चिखलदरा टुरिझम पॉईन्ट – पंचबोल | १४.०० |
| ५. चिखलदरा परिक्षेत्रातील कलालकुंड व बकादरी पर्यंतच्या ट्रेक | १०.०० |
| ६. घटांग परिक्षेत्रातील खंड क्र.५७ | १०.०० |
| **एकूण :-** | **९३.००** |

तसेच सोबत सन २०१७-१८ चा नवीन बाब प्रस्तावही सादर करण्यात आला आहे.

त्यांचे राहणीमान उंचावेल याचीही काळजी घेण्यात यावी.

२. DPR करिता कंसल्टंट नेमण्यात यावा.

३. गावीलगड किल्ल्याकरिता प्रस्ताव तयार करावा. तसेच या प्रस्तावात पुरातन वास्तु स्ट्रक्चरला इजा न पोहचविता पुरातत्व विभागाच्या परवानगिने दुरूस्ती करण्यात यावी. तसेच पुरातत्व विभागाचे परवानगिने काही ठिकाणचे नवीन बांधकाम करता येऊ शकेल की काय? याचीही पडताळणी करावी.

४. संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प हस्तांतरित करून त्यांचेमार्फत देखरेखीची कामे करावीत.

५. नागपूर ठिकाणापासून पर्यटकांना पर्यटन स्थळी येणे सोयीचे व्हावे म्हणून सर्कीट टुरिझमची पडताळणी करावी जेणेकरून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना पर्यटन स्थळी पोहोचणे सोईचे होईल.

वरिल अटी व सूचनांच्या अधिन राहुन **प्रकल्प आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

## नाशिक वनवृत्त, नाशिक

**१३.०३ बित्तीका (बितनगड), ता. अकोले, जि. अहमदनगर, येथे पर्यटन स्थळ विकसित करणे –राजुर** (भ.व.का.) **वनक्षेत्र, संगमनेर उप विभाग**.

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१३.०३** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री. एम.आर. जामकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मुख्य वनसंरक्षक | सदर प्रकल्पाचे सादरीकरण व चर्चेअंती समितीद्वारा |

| | | |
|---|---|---|
| | (प्रादेशिक), नाशिक यांचेमार्फत **जिल्हा वार्षिक योजना पर्यटन स्थळाचा विकास करणे** (४४०६-३४३७) **अंतर्गत सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाचा रूपये १०४.५० लक्ष रक्कमेचा** विषयांकित **बित्तीका (बितनगड), ता. अकोले** येथे पर्यटन स्थळ विकास आराखडा, सादर करण्यात आला आहे.<br>**जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत आलाखड्यामध्ये पुढीलप्रमाणे कामे प्रस्तावित केली आहेतः-**<br>**सन २०१७-१८** : औषधी व शोभिवंत रोपांची लागवड करणे / फायबर बाक १० नग (जागेवरील सिमेंट फिटींगसह) / माहिती फलक लावणे / पिण्याच्या पाण्यासाठी प्लॅस्टिक टाकी / रस्त्याच्या कडेला कचरा कुंड्या बसविणे / लोखंडी संरक्षण कठडे / पायऱ्यांना रेलिंग संरक्षण कठडे तयार करणे / पायवाटा दुरूस्ती करणे / संरक्षण कठडे रेलिंगसह / पॅगोडा / पर्यटकांसाठी तंबूसह ओटे / किल्ला माहिती फलक. (**एकूण रू.४७.०० लक्ष**).<br>**सन २०१८-१९** : अपारंपारिक उर्जा संयंत्र सौर पथदिवे उभारणे/ निरीक्षण मनोरा तयार करणे (वाहतूकीसह बसविणे)/ जुन्या वृक्षांना ओटे तयार करणे/गुहा ३ व कुंड ३ साफसफाई करणे /कुंड दुरूस्ती करणे/निसर्ग परिचय केंद्र (NIC). (**एकूण रू. ३६.५० लक्ष**).<br>**सन २०१९-२०** : भाविकांसाठी फायबर निवासस्थान उभारणे. (**एकूण रू. २१.०० लक्ष**).<br>**तीन वर्षाची समस्त एकूण : रू. १०४.५० लक्ष.** | पुढील प्रमाणे सूचना दिली.<br>सदर प्रकल्प जरी जिल्हा वार्षिक योजनेतून राबवावयाचे प्रस्तावित असले तरी हा प्रकल्प जिल्हा वार्षिक योजना व राज्य स्तरिय योजना या **दोन्ही योजनांच्या स्त्रोतातून** भागविण्यात यावा.<br>**अंतिमतः प्रस्तावास समितीने मंजुरी दिली.** |

**१३.०४ उंबरेश्वर मंदीर देवस्थान परिसरांत मौजे खळी, वनक्षेत्र संगमनेर भाग-३, ता.संगमनेर, जि. अहमदनगर येथे पर्यटन कामांचा विकास प्रकल्प.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १३.०४ | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री. एम.आर. जामकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक यांचेमार्फत **जिल्हा वार्षिक योजना पर्यटन** | सादरकर्त्यांनी सदर प्रकल्प **जिल्हा वार्षिक योजनेमधुन** |

**स्थळाचा विकास करणे** (४४०६-३४३७) **अंतर्गत सन २०१७-१८ ते २०१८-१९ या दोन वर्षाचा रूपये ५७.०० लक्ष रक्कमेचा** विषयांकित उंबरेश्वर मंदीर परिसर विकास आराखडा, सादर केला आहे.

**प्रकल्प आलाखड्यानुसार करावयाची कामे** :-

| अ.क्र. | विषय | संख्या |
|---|---|---|
| १ | वनरस्त्याच्या दुतर्फा शोभिवंत वृक्ष लागवड करणे. | २००० रोपे |
| २ | निसर्ग पायवाटा. | २ कि.मी. |
| ३ | औषधी वृक्ष लागवड व परिसरात सुशोभिकरण करणे. | ०५ हे. |
| ४ | मृद संधारण व जलसंधारणाची कामे घेणे. | १० हे. |
| ५ | अपारंपारिक उर्जा संयंत्र. | १० |
| ६ | सिमेंट बाक. | १० |
| ७ | पर्यावरणपुरक माहितीदर्शक फलक तयार करणे. | १५ |
| ८ | प्रवेशद्वार व चौकी उभारणे. | १ |
| ९ | निरीक्षण मनोरा (वॉच टॉवर). | १ |
| १० | प्रवेशद्वार | १ |
| ११ | पर्यावरणपुरक पॅगोडा उभारणे. | १ |
| १२ | अपारंपारिक उर्जा संयंत्र (सोलर लॅम्प). | १० |
| १३ | चैन लिंक (तार कंपाऊंड). | १ |
| १४ | बायोडायजेस्ट टॉयलेट उभारणे. | १ |
| १५ | पिण्याच्या पाण्यासाठी प्लॅस्टिक टाकी बसविणे. | २ |
| १६ | कचरापेटी बसविणे. | १ |

या व्यतिरिक्त कायमस्वरूपी पाण्याची सोय करणे / भक्त निवास / उंबरेश्वर मंदीर परिसरात बालोद्यान तयार करणे / सिमेंट रस्ता २ कि. मी. / पार्कींग व्यवस्था करणे / मुलांना खेळण्यासाठी खेळणी साहित्य उभारणे / पेव्हिंग ब्लॉक बसविणे / सभा मंडप तयार करणे / पायऱ्या व रेलिंग करणे इ. कामे प्रस्तावित आहेत.

**जिल्हा वार्षिक योजना** पर्यटन स्थळाचा विकास करणे (४४०६-३४३७) अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये रू.४.२१ लक्ष, २०१५-१६ मध्ये रू.१६.१६ लक्ष व २०१६-१७ मध्ये रू.११.२८ लक्ष **अशी एकूण रू.३२.१५ लक्षची कामे करण्यात आली आहेत**.

घ्यावयाचा आहे असे स्पष्ट केले. त्यावर सदस्यांनी विचार केली की, राज्य योजनेअंतर्गत काही प्रकल्प नाहीत काय? यावर सादरकर्त्यांनी खुलासा केला की, राज्य योजनेअंतर्गत नवीन प्रकल्प नाहीत.

**चर्चेअंती सदर प्रकल्पास समितीची मान्यता देण्यात आली**.

**१३.०५ ढुमेश्वर (खंडोबा) मंदिर परिसर विकास आराखडा, मौजे पिंपळगांव देपा, वनक्षेत्र- संगमनेर भाग-३, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, उपवन विभाग – संगमनेर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १३.०५ | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री. एम.आर. जामकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक यांचेमार्फत **जिल्हा वार्षिक योजना पर्यटन स्थळाचा विकास करणे** (४४०६-३४३७) **अंतर्गत सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाचा रूपये ९२.०० लक्ष रक्कमेचा** विषयांकित ढुमेश्वर (खंडोबा) मंदीर परिसर विकास आराखडा, सादर केला आहे.<br>**प्रकल्प आराखड्यानुसार खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत:-**<br>६ x ६ मी.वर १x१ मी. आकाराच्या खड्यातील वृक्ष लागवड करून परिसर सुशोभित करणे-१०० हे., निसर्ग पायवाटा-३ कि.मी., मंदीराची डागडुजी करणे व रंगरंगोटी करणे-१, मृदसंधारण व जलसंधारणाची कामे घेणे-१०० हे., अपारंपारिक उर्जा संयंत्र-२०, सिमेंट बाक-४०, पर्यावरणपुरक माहितीदर्शक फलक तयार करणे-२५, प्रवेशद्वार व चौकी उभारणे-१, कायम स्वरूपी पाण्याची सोय (बोअरवेल, मोटार पाईपलाईनसह)-१, बांबु झोपडी-१, वनतळे-४, वन्यप्राण्यांसाठी पाणवठे-६, पर्यावरणपुरक पॅगोडा उभारणे-४, पार्किंग व्यवस्था करणे-१, मंदीर परिसरात रेलिंग, कठडा व पेव्हींग ब्लॉक बसविणे-२२०० र.मी., बायोडायजेस्ट टॉयलेट उभारणे-१, पिण्याच्या पाण्यासाठी प्लॅस्टिक टाकी बसविणे-२, पेव्हींग ब्लॉक-५०० चौ.मी., कचरा पेटी बसविणे-२५, सभामंडप-१, पायऱ्या व रेलिंग करणे-२१०० र.मी., दगडी बांध (कंटुर बंडींग)-२५, मंदीर परिसर सपाटीकरण करणे-१.<br>**सन २०१७-१८ ते २०१९-२० मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा तपशील पुढील प्रमाणे:-**<br>सन २०१७-१८ : माहिती फलक तयार करणे-४०, पर्यावरणपुरक सिंमेंट बाकडे-४०, अपारंपारिक ऊर्जा सयंत्र-२०, | सादरकर्त्यांनी सदर प्रकल्प **जिल्हा वार्षिक योजनेमधुन** घ्यावयाचा आहे असे स्पष्ट केले. **चर्चेअंती सदर प्रकल्पास समितीची मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | कचरा पेटी बसविणे-२५, पायऱ्या व रेलींग करणे-२०० मी. रक्कम रूपये २७.५० लक्ष.<br>सन २०१८-१९ : पेव्हींग ब्लॉक बसविणे-५०० चौ.मी., पिण्याच्या पाण्याची सोय करणे-२, प्रवेशद्वार व चौकी उभारणे-१, पॅगोडा उभारणे-३, बायोडायजेस्ट टॉयलेट उभारणे-१. रक्कम रूपये २०.५० लक्ष.<br>सन २०१९-२० : सभा मंडप-१, बांबु झोपडी-२, कायम स्वरूपी पाण्याची सोय करणे-१, मंदीर डागडुजी, रंगरंगोटी, सपाटीकरण-१, पार्किंग व्यवस्था-१, मंदीर परिसरात रेलिंग, कठडा, पेव्हींग ब्लॉक-१. रक्कम रूपये ४४.०० लक्ष.<br>**तीन्ही वर्षाच्या कामांसाठी प्रस्तावित एकूण रक्कम रूपये ९२.०० लक्ष.** | |

**१३.६ मौजे ओझरखेड वन उद्यान, वनपरिक्षेत्र- दिंडोरी, वनविभाग पूर्व भाग, नाशिक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१३.०६** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री. आर. जे. गायकवाड, सहाय्यक वनसंरक्षक, पूर्व भाग नाशिक** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, ह्या स्थळाचा प्रकल्प सन २०१५ मध्ये सादर केला होता. **काही कामे जिल्हा वार्षिक योजनानिधीतून करण्यात आली** आहेत. आता सदर स्थळाचा प्रकल्प आराखडा हा वास्तुशिल्प शास्त्रज्ञाकडुन बनविण्यात आला असुन तो समितीपुढे सादर करण्यात येत आहे.<br>या प्रस्तावानुसार विकासकामे पूर्ण झाल्यानंतर या केंद्राची पुढील देखभाल ही ओझरखेड येथील स्थानिक वनसंरक्षण समिती करण्यास तयार असलेबाबतचा ठराव केला आहे. या माध्यमातून संयुक्त वनव्यवस्थापन समिती, ओझरखेड यांना देखील उत्पन्नाचे साधन निर्माण होईल.<br>प्रकल्पामध्ये पुढीलप्रमाणे कामे प्रस्तावित केली आहेतः-<br>वन्यप्राणी व वनसंपदेविषयी प्रबोधन करणारे | सदर प्रकल्पाचे सादरीकरण व पुढीलप्रमाणे चर्चा करण्यात आली व चर्चेअंती समितीद्वारा पुढील प्रमाणे सूचना देण्यात येवुन निर्णय घेण्यात आला.<br>१. सदर प्रकल्प स्थानिक पर्यटक दर्जाचा दिसून येतो.<br>२. दरमहा ८ ते १० हजार पर्यटक येतील असा अंदाज सादरकर्त्यांनी विचारणेअंती व्यक्त केला.<br>३. मार्केटींग प्लान तयार करून प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | माहिती केंद्र / निसर्ग पायवाट / सौरउर्जेवरिल पथदिवे / लहान मुलांची खेळणी / व्यायाम करण्यासाठी साधने / फुलपाखरू उद्यान / औषधी वन उद्यान / नक्षत्र उद्यान / जेट्टी / शौचालय / नैसर्गिक संगित साधने.<br>प्रकल्प आराखड्यासोबत सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंतच्या कालावधीमध्ये घेतलेल्या व घ्यावयाच्या कामाचा वर्षवार तपशिल देऊन **एकूण रू.३८९.३५ लक्षचा चालू बाब प्रस्ताव जोडला असुन हा निधी राज्य स्तरिय योजनेंतर्गत निसर्ग पर्यटन या योजनेतून उपलब्ध करून देण्यात यावा.** | ४. अंदाजे ३० ते ४० स्थानिक लोकांना रोजगार मिळेल असे सादरकर्त्यांनी स्पष्ट केले.<br>**चर्चेअंती सदर प्रस्तावास समितीची मान्यता देण्यात आली.** |

**१३.०७ मार्कंड पिंप्री ता. कळवण वनपर्यटन व वनविकास आराखडा, वनपरिक्षेत्र- कळवण (प्रादेशिक), पूर्व भाग, नाशिक वनविभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१३.०७** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री. आर. जे. गायकवाड, सहाय्यक वनसंरक्षक, पूर्व भाग, नाशिक** यांनी केले.<br>सन २०१२-१३ ते २०१४-१५ पर्यंत एकूण रू.९५.५२ लक्षची कामे झालेली आहेत. आता **सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंत वर्षवार एकूण रू.३३४.०० लक्षची कामे जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित आहेत.**<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मार्कंडेय पर्वत हा पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांगेत असून पश्चिम घाटातील दुर्मिळ व नामशेष होणारी जैवविविधता टिकविण्यासाठी सदर पर्यटन स्थळाचा विकास केल्यास काही प्रमाणात मदत होईल. त्याचप्रमाणे सदर जैवविविधतेबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण होईल. पुढे स्पष्ट केले की, संयुक्त वनव्यवस्थापन समिति मार्कंड पिंप्री मार्फत वनक्षेत्राचे वनसंवर्धन, वनविकास व त्याचबरोबर गड किल्ल्याचे जतन करून सांस्कृतिक वारसा टिकवुन ठेवणे अभिप्रेत आहे. तसेच वनसंवर्धनाबरोबर निसर्गरम्य ठिकाणे जतन करून निसर्ग पर्यटनास चालना देणे व संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना प्रवेश शुल्क, उपद्रव शुल्क | सादरीकरणादरम्यान विचारणेअंती पुढील प्रमाणे खुलासा करण्यात आला:-<br>१. वार्षिक ७ ते ८ हजारापर्यंत भाविक येतात.<br>२. शारिरीकदृष्ट्या अपंग लोकांसाठी काहीही व्यवस्था नाही.<br>चर्चेअती **प्रकल्प आराखड्यास समितीद्वारा मंजुरी प्रदान करण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | मिळवुन त्यांचे उत्पन्न वाढविणे व स्थानिक ग्रामस्थाना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हा उद्देश ठेवण्यात आलेला आहे.<br>सदर प्रकल्प आराखड्यात प्रस्तावित कामे :-<br>मुळाणेबारी ते मार्कंडेय पर्वत पायऱ्या तयार करणे / मार्कंड पर्वतावरिल कुंडांची साफसफाई व डागडुजी करणे / मार्कंडेय पर्वतावर मुळाणेबारीकडील रस्त्याने जाणाऱ्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजुने लोखंडी पाईपांची रेलिंग तयार करणे / रस्त्यांचे दुतर्फा छायादार वृक्षांची लागवड करणे व त्यांना संरक्षक जाळ्या बसविणे, पाणी पुरवठा व संरक्षणाची व्यवस्था करणे / मार्कंड पिंप्री ते मार्कंडेय पर्वतावर जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने लोखंडी पाईपांची रेलिंग तयार करणे / मार्कंडेय पर्वतावर धोकादायक ठिकाणी जाळीचे कुंपण तयार करणे / मुळाणेबारी ते मार्कंडेय पर्वत पाईप रेलींग करणे / माहितीदर्शक फलक लावणे / किल्ल्यावरिल पायवाटांची दुरूस्ती करणे .<br>सन २०१२-१३ ते २०१४-१५ या तीन वर्षामध्ये सदर स्थळास एकूण २५,३७० पर्यटकांनी भेट दिली असुन त्यापासुन एकूण रू.१८,४६० एवढा महसूल प्राप्त झाला आहे. तसेच सन २०१२-१३ पासुनची पर्यटन विकासाची कामे ही संयुक्त वन व्यवस्थापन समिती, मार्कंड पिंप्री यांचेमार्फत करण्यात येत आहेत त्यामुळे **मार्कंड पिंप्री गावातील सर्व लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.** | |

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे वनवृत्त, पुणे

**१३०.८ मौजा बनेश्वर वन उद्यान, वनपरिक्षेत्र - नसरापुर, उप वन विभाग - भोर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| **१३.०८** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री के. एम. येळे, वनपरिक्षेत्राधिकारी, उपवनविभाग - भोर** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की, मुख्य वनसंरक्षक | कार्यकारी समितीची मान्यता गृहित |

| | | |
|---|---|---|
| | (प्रादेशिक), पुणे यांचेमार्फत विषयांकित बनेश्वर वन उद्यानाचा इको-टुरिझम **राज्य योजनेंतर्गत** (२४०६-२२९५) **सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाचा रूपये १७०.०० लक्ष रक्कमेचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>**एकूण रू.१७०.०० लक्षच्या ३ वर्ष कालावधीच्या** नवीन आराखड्यामध्ये वर्षवार कामे पुढीलप्रमाणे प्रस्तावित केलेली आहेतः- **सन २०१७-१८ :** निरीक्षण मनोऱ्यावरती ॲन्टी स्डि फरशी बसविणे, निरीक्षण मनोऱ्याकडे जाणाऱ्या वाटेला पेव्हींग ब्लॉक बसविणे, उत्तर बाजुने चेनलिंक फेन्सींगसोबत वाय अँगलवरती स्पायरल काटेरी तार बसविणे, नदीकडील बाजुस चेनलिंक फेन्सींगसोबत वाय अँगलवरती स्पायरल काटेरी तार बसविणे, बालोद्यानामध्ये झोपाळे व खेळणी बसविणे, पर्यटकांना बसण्यासाठी बेंचेस बसविणे, ठिकठिकाणी कचरा कुंड्या बसविणे, जुनी विहीर गाळ काढणे व दुरूस्ती करणे, निसर्ग निर्वाचन केंद्र दुरूस्ती व रंग देणे इ., पिण्याच्या पाण्याची जुनी जीर्ण पाईप लाईन बदलने, वॉटर एटीएम बसविणे, सोव्हिनर विक्री केंद्र सुरू करणे, बांबु संरक्षण कुटी तयार करणे, ट्री हाऊस तयार करणे (**एकूण रू.६८.५० लक्ष**). **सन २०१८-१९** : बांबु संरक्षण कुटी – १, बांबु विविध प्रजातीची लागवड करणे, बेलवण तयार करणे व विविध जातीची फुलझाडे लावणे, स्वच्छता गृहाकडे जाणाऱ्या वाटेला पेव्हींग ब्लॉक बसविणे, साईनेजेस बोर्ड तयार करणे, लहान मुलांसाठी बालोद्यानात ट्रेन बसविणे, मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण करणे, नाना-नानी पार्कमध्ये झोपाळे तयार करणे व बेंचेस बसविणे, बोपन जिम साहित्य (**एकूण रू.५८.५० लक्ष**). **सन २०१९-२०** : बांबु संरक्षण कुटी तयार करणे, पाऊलवाटा दुरूस्ती करणे व रोलिंग बसविणे, जुनी मजुर कुटी दुरूस्ती व स्वच्छता गृह उभारणे, (**एकूण रू.४३.०० लक्ष**). | धरून **केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात आली**. **तसेच सादरीकरण व चर्चेअंती सदर प्रस्तावास समितीने मंजुरी दिली**. |

**१३.०९ मौजे कोथरूड, फॉ.स.नं. १०२, भांबुर्डा वनपरिक्षेत्र, पुणे वन विभाग, पुणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१३.०९** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री एम.पी. भावसार**, **सहा.** | **सादरीकरण व** |

| | | |
|---|---|---|
| | **वनसंरक्षक**, **पुणे वनविभाग** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी खालील बाबी स्पष्ट केल्याः-<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचेमार्फत मौजे कोथरूड, स.नं.१०२ येथे **नागरी वन उद्यान व विविध कामांचा विकास सन २०१७-१८ ते २०१८-१९ या दोन वर्षाचा राज्य योजना-निसर्ग पर्यटन** (२४०६-२२९५) **अंतर्गत रूपये ४९८.२७ लक्ष रक्कमेचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे कामे प्रस्तावित केली आहेतः-<br>**सन २०१७-१८ ते २०१८-१९ या दोन वर्ष कालावधीच्या** आराखड्यामध्ये वर्षवार कामे पुढीलप्रमाणे प्रस्तावित केलेली आहेतः-<br>**सन २०१७-१८ :** माहिती फलक लावणे-१०, प्रवेशद्वार बसविणे-१, प्रवेशद्वार कमान तयार करणे-१, प्रवेशद्वार कमानीस लाकडी आभास देणे-१, लाकडी आभासाचे बाक बनविणे-१५, वनतलाव खोदणे क्र.१, वनतलाव खोदणे क्र.२, व वनतलाव खोदणे क्र.३, वनतलाव क्र.१ मध्ये कायम स्वरूपी पाणी साठण्याकरिता जलरोधक उपचार देणे-१, वनतलाव क्र.२ मध्ये कायम स्वरूपी पाणी साठण्याकरिता जलरोधक उपचार देणे-१, वनतलाव क्र.३ मध्ये कायम स्वरूपी पाणी साठण्याकरिता जलरोधक उपचार देणे-१, संरक्षण कुटी उभारणे-१, पाणी साठवण टाकी क्र.१ तयार करणे, पाणी साठवण टाकी क्र.२ तयार करणे-१, पाणी साठवण टाकी क्र.३ तयार करणे-१, मोठा निरीक्षण मनोरा (पॅगोडा) उभारणे-१, पॅगोडा सभोवताली सुशोभिकरण करणे-२, औषधी रोपांची लागवड करणे-५००, वनतलाव सभोवती सुशोभिकरण करणे-३, सौर दिवे बसविणे-१०, कचरा कुंड्या बसविणे-१०, मोठे जल शोषक चर खोदुन त्यावर बांबुची लागवड करणे-२५, क्षेत्राचा कंटुर सर्व्हे करणे-५०, निरीक्षण मनोरा उभारणे-१, खुले मंच उभारणे-१, प्राण्यांची प्रतिकृती उभारणे-२५, लाकडी आभास असलेले पूल उभारणे-१, मोठे जल शोषक चर खोदून त्यावर बांबुची लागवड करणे-२५, संरक्षण व देखभाल-५०, बाल उद्यान लहान मुलांसाठी फायबरची खेळणी संच-१३, वनक्षेत्रातील प्राचिन म्हातोबा मंदिर परिसरात देवराई विकसीत करणे-१, नक्षत्र वन तयार करणे-१, व जैव विविधता वन तयार करणे-१. **एकुण प्रस्तावित रक्कम रू.२५२.२७ लक्ष आहे. सन २०१८-१९ :** फेरोक्रेट ट्री हाऊस / झाडावरील मचानवर जाणाऱ्या पायऱ्यासह-१, लाकडी आभास असलेले मचान उभारणे-२, पक्षी | **चर्चेअंती सदर प्रकल्प आराखडयास समितीने मान्यता प्रदान केली**. |

| | | |
|---|---|---|
| | निरीक्षण केंद्र उभारणे-२, माहिती केंद्रातील अंतर्गत सजावट-१, ज्येष्ठ पर्यटक व लहान मुलांसाठी बॅटरीवर चालणारी छोट वाहन-४, सदर ठिकाणची माहिती / जैवविविधता / पक्षी / प्राणी यासंबंधीत लघुपट तयार करणे-१, वनक्षेत्रातील प्राचिन म्हातोबा मंदिराच्या पायवाटीच्या भोवती सुशोभिकरण करणे-१५०, स्मृती वन तयार करणे-१, सुगंधी वन तयार करणे-१, व बकुळ वन तयार करणे-१. **एकुण प्रस्तावित रक्कम रू.२४६.०० लक्ष आहे.**<br>**एकूण प्रकल्प रक्कम रू.४९८.२७ लक्ष.** | |

**१३.१० मौजे हिंगणे, स.नं. १७ व १८, भांबुर्डा वनपरिक्षेत्र, पुणे वन विभाग, पुणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| **१३.१०** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री एम.पी. भावसार, सहा. वनसंरक्षक, पुणे वनविभाग** यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी खालील बाबी स्पष्ट केल्याः-<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचेमार्फत मौजे हिंगणे, स.नं.१७ व १८ येथे **नागरी वन उद्यान व विविध कामांचा विकास सन २०१७-१८ ते २०१८-१९ या दोन वर्षाचा राज्य योजना-निसर्ग पर्यटन (२४०६-२२९५) अंतर्गत रूपये ४८७.३७ लक्ष रक्कमेचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>सन २०१७-१८ ते २०१८-१९ या दोन वर्ष कालावधीच्या आराखड्यामध्ये वर्षवार कामे पुढीलप्रमाणे प्रस्तावित केलेली आहेतः-<br>**मौजे हिंगणे स.नं.१७, सन २०१७-१८ (प्रस्तावित खर्च- रू.९२.२० लक्ष)** : वनतलाव खोदणे क्र.२-१, वनतलाव क्र.२ मध्ये कायम स्वरूपी पाणी साठण्याकरिता जलरोधक उपचार देणे-१ , संरक्षण कुटी उभारणे-१, , पाणी साठवण टाकी क्र.१ तयार करणे-१, मोटार / पाईप / पंप इत्यादी-१, संरक्षण व देखभाल-१, बाल उद्यान लहान मुलांसाठी फायबरची खेळणी संच-१३, नक्षत्र वन तयार करणे-१, वाहनतळ मजबुतीकरण करणे-१, निसर्ग पायवाट दुरूस्ती व बळकटीकरण करणे १ ते १००० (१००० र.मी.), | **सादरीकरण व चर्चेअंती सदर प्रकल्प आराखडयास समितीने मान्यता प्रदान केली.** |

| | | |
|---|---|---|
| | सुरक्षेच्या दृष्टीने रिटेनिंग भिंत बांधणे -१.<br>**मौजे हिंगणे स.नं.१८, सन २०१७-१८ (प्रस्तावित खर्च-रू.१९२.९२ लक्ष) :** प्रवेशद्वार बसविणे-२, प्रवेशद्वार कमान तयार करणे-२, वनतलाव खोदणे क्र.१-१, वनतलाव क्र.१ मध्ये कायम स्वरूपी पाणी साठण्याकरिता जलरोधक उपचार देणे-१ , संरक्षण कुटी उभारणे-१, मोठा निरिक्षण मनोरा (पॅगोडा) उभारणे-१, क्षेत्राचा कंटुर सर्व्हे करणे-१० हे., निसर्ग परिचय केंद्र उभारणे-१, नक्षत्र वन तयार करणे-१, जैव विविधता वन तयार करणे-१, फुलपाखरू उद्यान वन तयार करणे-१, वन औषधी वन तयार करणे-१, स्मृती वन तयार करणे-१, संरक्षण व देखभाल-१० हे., निसर्ग पायवाट दुरूस्ती व बळकटीकरण करणे-१ ते १००० (१००० र.मी.).<br>**(स.नं. १७ व १८ करिता वर्ष २०१७-१८ चा एकूण अपेक्षित खर्च: रू.९२.२० +१९२.९२ = २८५.१२ लक्ष)**<br>**मौजे हिंगणे स.नं.१७, सन २०१८-१९ (प्रस्तावित खर्च-रू.४८.०० लक्ष) :** सौर दिवे बसविणे-२०, कचरा कुंड्या बसविणे-२०, प्राण्यांची प्रतिकृती उभारणे-१०, कंपोस्ट खत व गांडुळ खत प्रकल्प राबविणे-१, निसर्ग पायवाटीच्या दुतर्फा सुशोभीकरण करणे-१ ते १००० (१००० र.मी.), सदर ठिकाणची माहिती, जैवविविधता, पक्षी, प्राणी यासंबंधीत लघुपट तयार करणे-१.<br>**मौजे हिंगणे स.नं.१८, सन २०१८-१९(प्रस्तावित खर्च-रू.१५४.२५ लक्ष) :** माहिती फलक लावणे-३०, प्रवेशद्वार कमानीस लाकडी आभास देणे-२, लाकडी आभासाचे बाक बनविणे-३०, पाणी साठवण टाकी क्र.१ तयार करणे-१, पंप, पाईपलाईन इत्यादी-१, निरिक्षण मनोरा सभोवताली सुशोभीकरण करणे-२, शोभिवंत रोपांची लागवड करणे-१०००, वनतलावासभोवती सुशोभीकरण करणे-३, सौर दिवे बसविणे-२०, कचरा कुंड्या बसविणे-२०, प्राण्यांची प्रतिकृती उभारणे-२५, बालोद्यान लहान मुलांसाठी फायबरची खेळणी संच-१०, कंपोस्ट खत व गांडुळ खत प्रकल्प राबविणे-१, वाहनतळ मजबुतीकरण करणे-१, सदर ठिकाणची माहिती, जैवविविधता, पक्षी, प्राणी यासंबंधित लघुपट तयार करणे-१.<br>**(स.नं. १७ व १८ करिता वर्ष २०१७-१८ व वर्ष २०१८-१९ चा एकूण अपेक्षित खर्च: रू.९२.२० +१९२.९२ = २८५.१२ लक्ष व रू.४८.००+१५४.२५ =२०२.२५ लक्ष = एकूण प्रकल्प किंमत रू.४८७.३७ लक्ष)** | |

**१३.११ मौजे वारजे ता.हवेली, भांबुर्डा वनपरिक्षेत्र येथील नागरी वनोद्यानाचा पुरवणी आराखडा.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| **१३.११** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री एम.पी. भावसार, सहा. वनसंरक्षक, पुणे वनविभाग** यांनी केले.<br>सादरीकरणादरम्यान त्यांनी स्पष्ट केले की,<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचेमार्फत **मौजे वारजे, ता. हवेली, भांबुर्डा वनपरिक्षेत्र स्थळाचा सन २०१७-१८ करिता एक वर्षाचा राज्य योजनांतर्गत योजना (०२) (०६) इको-टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) अंतर्गत रूपये ४५.३४ लक्ष रक्कमेचा पुरवणी आराखडा** मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>या पर्यटन स्थळाचा मूळ आराखडा दिनांक ०१.०१.२०१६ ला झालेल्या निसर्ग पर्यटन तज्ञ समितीच्या सभेत सन २०१४-१५ ते २०१६-१७ या ३ वर्षासाठी मंजूर झालेला असून आराखड्याची एकूण किंमत **रू.२३५.७८ लक्ष** आहे. मंजूर आराखड्याचा कालावधी सन २०१६-१७ ला संपलेला आहे. तथापि, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे ह्यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-१/योजना/प्र.क्र.२७/ ७४०/ दिनांक २८/०८/२०१७ मध्ये केलेल्या खुलाशानुसार मा. केंद्रीय मंत्री, श्री प्रकाश जावडेकर ह्यांचे सूचनेनुसार प्रस्तावात नमूद करण्यात आलेली कामे सन २०१७-१८ मध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२/यो/नि.प.प.क्र.२९/४६४/१७-१८ दिनांक २७/१०/२०१७ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी सन २०१७-१८ चा रू.४५.३४ लक्षचा चालू बाब प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मंजूर आराखड्यानुसार तपासला असता प्रपत्र-ब मध्ये नमूद असलेल्या सर्व कार्यबाबी मंजूर मूळ आराखड्यात समाविष्ट नाहीत. त्यामुळे **या रू.४५.३४ लक्ष रक्कमेच्या पुरवणी आराखडयास कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक आहे.**<br>पुरवणी आराखड्यानुसार करावयाच्या विविध कामांचा तपशिल खालील प्रमाणे :- | कार्यकारी समितीची मान्यता गृहित धरून **रू.४५.३४ लक्ष रक्कमेच्या पुरवणी आराखडयास कार्यकारी समितीची कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | खाणीमध्ये खडकाचे शिल्प उभारून त्याचे सुशोभिकरण करणे-५ / अस्तित्वात असलेल्या व नवीन पायवाटेच्या दुतर्फा रोपे लागवड करून सुशोभिकरण करणे-१ / वेलींचे ग्रीन टनेल क्र. तयार करणे-१ / पशु पक्षी शिल्प उभारणे-१ / पायवाटेच्या प्रवेश भागामध्ये आर सी सी बांधकामाची कमान बांधणे-१ / पायवाटेच्या प्रवेश भागामध्ये कमानीस फेरोक्रेटची लागडी आभास देणे-१ / वाहनांसाठी जागा तयार करणे-१ / कॅक्टस व इतर शोभिवंत रोपांचे गार्डन तयार करणे-१ / फुलपाखरे व पक्षी यांना आकर्षित करणेकरिता विशिष्ट प्रकारची रोपे लावणे-१.<br>सदर प्रकल्पात रानमेवा संकल्पना सुद्धा राबविण्यात येणार आहे. त्याचा थोडक्यात तपशील येणप्रमाणे-<br>स्मृती वन / चरकवन / बोधीवन / गणेशवन / पित वन, ताम्र वन, निल वन / पंचवटी वन / खाणींचे सुशोभिकरण / संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरा / नागरिकांसाठी सोयी-सुविधा / पर्यावरण शिक्षण. | |

**१३.१२ भोर तालुक्यातील किल्ले विकास आराखडा (राजगड, तोरणगड, रोहिंदा, रायरेश्वर)**

**Trek destination Development Plan, Pune District, Nasarapur, Velha and Bhor Range.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १३.१२ | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री के.एम. येळे, वनपरिक्षेत्राधिकारी, उपवनविभाग - भोर** यांनी केले.<br>सादरीकरणादरम्यान खालील बाबी स्पष्ट केल्या.<br>**सदर प्रकल्प सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या तीन वर्ष कालावधीचा असुन एकूण रू.८९६.१० लक्ष प्रस्तावित रक्कम आहे.**<br>**Assignmnent Background :** Nasarapur, Velha and Bhor Talukas in Pune District possesses various attractive spots of natural beauty and rich cultural heritage. There is an array of ancient sculpture site of heritage value, breath-taking landscape, exotie wildlife, temple towns, Heritage sites, Tembles, Forts, Forests, Water Falls, Wildlife, Western Ghats, and Hill stations. In this back ground, there | सादरीकरणादरम्यान सदस्यांनी पुढील प्रमाणे सादरकर्त्यास विचारणा केली:-<br>१. विचारणेअंती सादरकर्त्यांनी स्पष्ट केले की, सदर प्रकल्प संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना प्रकल्प पूर्ण झाल्यावर देखरेखीसाठी हस्तांतरित करण्यात येणार आहे.<br>२. सदस्यांनी निर्देश दिले की, या ठिकाणी पावसाळ्यामध्ये ढग फार असतात व पाऊसही खुप असतो |

| | | |
|---|---|---|
| | are ample opportunities for tourism in Nasarapur, Velha and Bhor Talukas having traditional tourist spots, tembles with good sculptural glory, religious places, forest with spectacular beauty and good climatic conditions. The Sector is attracting significfant investment by domestic and global players as infrastructure is being ramped up to meet the needs of the growing tourist activity.<br>The department of forest sets a vision to promote Eco-tourism as principal and largest economic activity, as an employer, revenue-generator and engine of growth, by being among the top tourist destinations in Maharashtra.<br>In this context, M/s Treklife India Private Limited has been engaged by the Forest Department Pune District, Government of Maharashtra for providing Consultancy Services for "Trek Destination Development" report for following Trek.<br>(1) **Rajgad fort** (2) **Torna fort** (3) **Rohida fort** (4) **Rayreswar plato.**<br>Hence, the basic aim of the assignment is to strengthen the project development process for implementing Tourism Infrastructure Projects through Public Private Partnership (PPP).<br>**Proposed Infrastructure :-** Eco Camp (Tent accommodation) – (1) Big family tent 6 (2) Group tent 8. / Machaan (Watch Tower) / Recreational Centre – Interpretation Centre / Dustbins.<br>Circuiots established for tourism development :- By considering location of the spots, type of tourism products available at spot, road connectivity & tourism arrival from various locations tourism circuits are proposed, by clubbing the cost for the spots considered in the circuit, development for each circuit is calculated. By considering the accommodation facilities, roadconnectivity & | त्यामुळे बांबूचे बांधकाम उपयोगी पडणार नाही.<br>३. बांधकामाचे काम कमितकमी करण्यात यावे.<br>४. सदर प्रकल्प निसर्ग पर्यटनाचे दृष्टीने योग्य आहे तरिही पुरातत्व विभागाची परवानगी आवश्यक आहे.<br>चर्चेअंती **देखभालीच्या कामासाठी प्रस्तावित रू.८८.०० लक्ष वगळुन प्रकल्पास समितीची मान्यता देण्यात आली**. |

| | | |
|---|---|---|
| | tourist arrival from different locations priority of the circuits is suggested by this study.<br>**Project Implementation :-** Preparation Phase / Training Phase / Implementation Phase / Operational Phase / Monitoring and Improvement Phase / Future Directiions – Expansions. | |

| **Total Estimate Cost Summery for Project** | | |
|---|---|---|
| **Sr.No.** | **Trek Route Name** | **Amount (Rs. in lacs)** |
| 1 | Rajgad | 230.89 |
| 2 | Tomagad | 207.45 |
| 3 | Rohida | 204.36 |
| 4 | Rayreshwar | 253.40 |
| | **Total :-** | **896.10** |

**१३.१३ अवसरी घाट वनउद्यान, अंबेगाव तालुका, मंचर (T) वनपरिक्षेत्र, घोड पकल्प विभाग -जुन्नर.**

| **अ.क्र.** | **प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा** | **समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय** |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| **१३.१३** | सदर प्रकल्पाचे सादरीकरण **श्री पी. डी. पालवे, वनपरिक्षेत्राधिकारी, मंचर, जुन्नर वनविभाग** यांनी केले.<br>सादरीकरणादरम्यान त्यांनी स्पष्ट केले की,<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे **अवसरी घाट वनउद्यान स्थळाचा सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाचा राज्य योजनांतर्गत योजना (०२) (०६) इको-टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) अंतर्गत रूपये ६२०.३१ लक्ष रक्कमेचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>**Objective of Project**:- To enhance the productivity and quality of forest by imposing intensive forest management practices. / To identify physical infrasctructure | **सादरीकरण व चर्चेअंती सदर प्रकल्प आराखडयास समितीने मान्यता प्रदान केली.** |

| | | |
|---|---|---|
